महसूल व वन विभाग

# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय, जळगाव

(गृह शाखा)

आकाशवाणी केंद्राजवळ, जळगांव, ता.जि.जळगाव - 425 001

**दुरध्वनी क्रमांक** - 0257- 2220152 **ई मेल** - homebranchjalgaon@gmail.com

---

**वाचले :-** 1. आपत्ती व्यवस्थापन कायदा,2005

2. भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम 1897

3. सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय ,मुंबई यांचेकडील अधिसुचना करोना2020/प्रक्र.58/आरोग्य 5 दिनांक 14 मार्च, 2020

4. या कार्यालयाचे आदेश क्रमांक दंडप्र-01/कावि/2020/59/2, दिनांक 24 मार्च, 2020

5. महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन मंत्रालय मुंबई यांचेकडील अधिसूचना क्रमांक डीएमयु/2020/सीआर-92/डीआयएसएम-1, दिनांक 15 एप्रिल, 2020

6. भारत सरकार, गृह मंत्रालय, नवी दिल्ली यांचेकडील आदेश क्रमांक 40-3/2020/डीएम-आय (ए) दिनांक 15 एप्रिल, 2020

7. या कार्यालयाचे आदेश क्रमांक दंडप्र-01/कावि/2020/59/2, दिनांक 14 एप्रिल, 2020

8. या कार्यालयाचे आदेश क्रमांक दंडप्र-01/कावि/2020/136, दिनांक 15 एप्रिल, 2020

-----0000-----

क्र दंडप्र-01/कावि/2020/ 146

दिनांक 16 एप्रिल, 2020

**-: आदेश :-**

ज्याअर्थी, उपोद्घातात नमूद सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील पत्र दिनांक 14 मार्च, 2020 अन्वये करोना विषाणू (कोव्हिड 19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथ रोग प्रतिबंधात्मक कायदा, 1897 हा दिनांक 13 मार्च 2020 पासून लागू करुन खंड 2,3 व 4 मधील तरतूदीच्या अंमलबजावणीसाठी अधिसुचना निर्गमीत करणेत आलेली आहे आणि त्याबाबतची नियमावली प्रसिध्द केली असून जिल्हाधिकारी हे त्यांचे कार्यक्षेत्रात कोव्हिड 19 वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाय योजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित करण्यात आलेले आहेत.

आणि ज्याअर्थी, उपोद्घातात नमूद या कार्यालयाचे आदेश दिनांक 24 मार्च, 2020 अन्वये जळगांव शहर महानगरपालिका जळगांव तसेच जळगांव जिल्हयातील सर्व नगरपालिका/नगरपंचायत क्षेत्रातील व या शहरांच्या 03 किलो मीटर परिसरातील सर्व पेट्रोल/डिझेल पंप केवळ सकाळी 07.00 ते सकाळी 10.00 व दुपारी 04.00 ते सायं. 07.00 वाजे पर्यंतच सुरु राहण्याबाबत आदेशीत करण्यात आलेले आहे.

आणि ज्याअर्थी, सध्या शेतक-यांची रब्बी हंगामातील पिकांची वेगवेगळया यंत्राद्वारे / मशीनद्वारे कापणी, काढणी व मान्सुनपूर्व शेतीच्या मशागतीची कामे सुरु असून सदर कामांसाठी व शेतमालाच्या वाहतूकीसाठी शेतक-यांना कृषी संबंधित कामासाठी वापरण्यात येणारी यंत्रे, ट्रॅक्टर व तत्सम वाहनांना पेट्रोल / डिझेल ची आवश्यकता असल्याने या कार्यालयाचे आदेशानुसार शहरी भागातील पेट्रोल/डिझेल पंपावर इंधन भरणा करण्याबाबत वेळेचे बंधन लागू करण्यात आलेले असल्याने अडचण निर्माण होत असल्याची बाब माझ्या निदर्शनास आलेली आहे.

त्याअर्थी, मी, डॉ. अविनाश ढाकणे, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जळगांव आपत्ती व्यवस्थापन कायदा, 2005 अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन **"जळगांव जिल्हयातील महानगरपालिका, नगरपालिका व नगरपंचायत क्षेत्रातील व त्यांच्या 03 किलो मीटर परिसरातील**

Scanned with CamScanner

**सर्व पेट्रोल/डिझेल पंप चालक यांनी निर्धारीत केलेल्या वेळेत शेतक-यांची यंत्रे, ट्रॅक्टर व तत्सम वाहनांना पेट्रोल / डिझेल उपलब्ध करुन देण्याबाबत आदेशीत करण्यात येत आहे."**

सदर आदेशाचे उल्लंघन केल्यास सदर बाब ही भारतीय दंड संहिता, 1860 (45) चे कलम 188 नुसार शिक्षेस पात्र राहील.

सदरचा आदेश हा आज दिनांक 16/04/2020 रोजी माझ्या सही व कार्यालयाचे शिक्क्यानिशी दिला असे.

**(डॉ. अविनाश ढाकणे)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जळगांव**

**प्रत :- माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी**

1. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद जळगांव
2. पोलीस अधिक्षक जळगांव
3. आयुक्त, जळगांव शहर महानगरपालिका जळगांव
4. उपविभागीय दंडाधिकारी सर्व
5. कार्यकारी दंडाधिकारी सर्व
6. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, जळगांव
7. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगांव
8. जिल्हा शल्य चिकीत्सक, जळगांव
9. मुख्याधिकारी सर्व (नगरपालिका/नगरपंचायत)
10. विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, जळगांव
11. एरीया मॅनेजर, IOCL, BPCL, HPCL, NYRA, RELIANCE जळगांव
12. सेल्स ऑफिसर IOCL, BPCL, HPCL, NYRA, RELIANCE जळगांव
13. पेट्रोल/डिझेल डिलर्स असोसिएशन, जळगांव

**प्रत :- म. संचालक, येरवडा कारागृह, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, पुणे** यांनी सदरील आदेशाचे शासकीय राजपत्रात प्रसिध्दी देऊन त्याची दोन प्रती या कार्यालयास पुरविण्यात याव्यात.

**प्रत :- जिल्हा माहिती अधिकारी जळगांव** यांनी सदरील आदेशाचे जिल्हयातील सर्व स्थानिक वर्तमानपत्रात विनामुल्य प्रसिध्दी देण्याबाबतची कार्यवाही करावी.

Scanned with CamScanner